# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०३/११/२०२०**

## जिल्हा : पुणे

## मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३१.३ ते ३२.२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १५.२ ते १८.५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८२ ते ९६ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३६ ते ४४ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०.५ ते १.७ कि.मी. होता. मागील आठवड्यात ०.० मिमी एवढा पाऊस झाला.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्हयात कमाल तापमान ३२ ते ३३ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १६ ते १८ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ५९ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३२ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०६ ते १० कि.मी. दरम्यान राहील. आकाश निरभ्र ते अधूनमधून अंशतः ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा ईशान्येकडून नैऋत्तेकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (२८/१०/२०२० ते ०३/११/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०३/११/२०२० ते ०७/११/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | 3 | दिनांक | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 31.7 | 32.2 | 32.0 | 32.0 | 32.0 | 31.4 | 31.3 | कमाल तापमान )अं.से(. | 32 | 33 | 33 | 33 | 33 |
| 18.5 | 16.3 | 18.0 | 15.2 | 17.0 | 18.0 | 17.4 | किमान तापमान अं).से(. | 18 | 17 | 17 | 17 | 16 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 96 | 94 | 91 | 91 | 89 | 82 | 91 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 59 | 54 | 52 | 66 | 63 |
| 39 | 37 | 36 | 38 | 44 | 41 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 35 | 31 | 28 | 25 | 41 |
| 1.1 | 0.6 | 0.5 | 0.6 | 0.6 | 0.9 | 1.7 | वाऱ्याचा वेग (तास/किमी) | 7 | 6 | 8 | 10 | 8 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा )अंश( | 79 | 78 | 81 | 78 | 79 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार पुणे जिल्हयात दिनांक ०३ ते ०७ नोव्हेंबर, २०२० पर्यंत हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • खरीप पिकांची काढणी, मळणी करावी व काढलेल्या पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी.<br>• जिल्ह्यातील रब्बी ज्वारी, हरभरा व इतर पिकांची पेरणी करणेसाठी जमिनीची पुर्वमशागत करुन जमिन तयार करावी. पिकांची जमिनीच्या पुरेश्या ओलाव्यावर (वापसा आल्यावरच) योग्य खोलीवर बीजप्रक्रिया करून पेरणी करावी.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| भात | दाणे भरणे ते पक्वता | भात पीक कापणीपूर्वी ८ ते १० दिवस अगोदर भात खाचरातून पाण्याचा निचरा करावा. पिकांची काढणी, मळणी करावी व काढलेल्या पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी. |

| | | |
|---|---|---|
| गहू | पेरणी अवस्था | वेळेवर बागायती गव्हाची पेरणी करण्याकरिता योग्य वाणाची निवड करून १ ते १५ नोव्हेंबरपर्यंत बीजप्रक्रिया करुन पेरणी करावी .पेरणी करिता एन आय ए डब्लू ३०१ (त्र्यंबक) , एन आय ए डब्लू ९१७ (तपोवन), एन आय डी डब्लू २९५ (गोदावरी) हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. पेरणीच्या वेळी हेक्टरी ६० किलो नत्र , ६० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश व पेरणीनंतर ३ आठवडयांनी खुरपणी केल्यानतर उर्वरीत ६० किलो नत्र द्यावे. |
| हरभरा | पेरणी अवस्था | जिथे सिंचनाची सोय व जमिनीत पुरेशी ओल असेल तिथेच बागायती हरभरा १० नोव्हेंबर पर्यंत पेरणी केल्यास चांगले उत्पादन मिळते. पेरणीसाठी सुधारीत वाणांची निवड करावी. पेरणीसाठी विद्यापीठाने शिफारीत केलेल्या वाणास प्राधान्य द्यावे जसे विजय, विशाल, दिग्विजय, विराट, कृपा, जाकी ९२१८, साकी ९५९६, पीकेव्ही २, फुले विक्रम, फुले विक्रांत इ. वाण. पेरणी करण्यापूर्वी बीजप्रक्रियासाठी ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास चोळावे जेणेकरून संभाव्य बुरशीजन्य रोगापासून संरक्षण मिळेल. |
| तुर | फुलोरा | तूर पिकावरील शेंग अळीच्या नियंत्रणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टर लावावेत तसेच ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. तुरीमधील फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये घाटे अळी/पिसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक किड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे यामध्ये तृण धान्याचे आंतरपिक असल्यास किडीचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते, एच.एन.पी.व्ही (HNPV) य़ा जैविक किडनियंत्रणाचा वापर करावा .फुलकळी लागताना पहिली फवारणी निबोंळी अर्क ५ % दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १२ ते १५ दिवसांनी हेलीओकील (HNPV) ५०० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर व गरजेनुसार तिसरी फवारणी १८.५ % प्रवाही क्लोरअ‍ॅट्रीनिलीप्रोल १५० मिली अथवा इमामेक्टीन बेझोएट २०० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | काढणी, मळणी | सोयाबीनच्या पक्व पिकाची काढणी करून काडाचे छोटे छोटे ढीग करून प्रखर सूर्य प्रकाशात वाळवावे. त्यानंतर प्रादुर्भाव / उगवण झालेल्या शेंगा बाजूला काढून मळणी करावी. |
| कांदा | | कांदा पिकावरील फुलकिडे व करपा या किडीच्या व रोग नियंत्रणासाठी डायमेथोयएट ३० % ईसी १५ मिली किंवा ल्याम्डा सायहयालोथ्रीन ५ % ई सी ६ मिली + टेब्यूकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| वांगी | | वांग्यामध्ये शेंडा आणि फळे पोखरण्या-या अळीच्या नियंत्रणासाठी ४ % निंबोळी अर्क किंवा सायपरमेथ्रीन २५ %, ५ मिली प्रति १० लिटर या प्रमाणात फवारावे. दर आठवड्याला किडलेले शेंडे आणि फळे गोळा करुन नष्ट करावेत. |
| चारा पिक | पेरणी अवस्था | रब्बी हंगामात पशुधनासाठी मका, ओट, बरसीम, लसून घास व ज्वारी या चारा पिकाची जमिनीत वापसा आल्यावर पेरणी करावी. |
| आंबा | | आंबा पिकावर नविन फुटीवरील किड रोगांच्या नियंत्रणासाठी लॅमडा सायहेलोथ्रीन ५ % ईसी ६ मिली किंवा क्विनॅालफॉस २५ मिली + पाण्यात विरघरळणारे गंधक २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| केळी | | केळी पिकावरील करपा रोग नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानांचा भाग किंवा पाने काढून जाळावीत. झाडावर कार्बनडेन्झिम १० ग्रॅम किंवा डायथेन एम - ४५, २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज तसेच मिरची, वांगी यासारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावरांचा गोठा व दुध काढण्याची जागा शक्यतो वेगळी असावी. दुध काढण्यासाठी स्वच्छ मोकळी जागा वापरावी. सर्व जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वच्छ पाणी द्यावे. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.**

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा , कृ.म.वि., पुणे

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : ०३.११.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**